वलगाव, तालुका व जिल्हा अमरावती येथे संत गाडगेबाबांचे समाधीस्थळ विकसित करुन मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी "कार्यकारी समिती" मध्ये स्थानिक व्यक्तींचा "सदस्य" म्हणून समावेश करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः तिक्षेवि-२०१७/प्र.क्र.४८/का-१४४४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ३१ जानेवारी, २०१८.

<u>संदर्भ</u> :-१. नियोजन विभाग शासन निर्णय क्र.तीक्षेवि-२०१२/प्र.क्र.७७/का.१४४४ दि.२२ ऑक्टोबर,२०१२.
२. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. तीक्षेवि- २०१२/प्र.क्र.७७/का. १४४४ दि.१५ जुलै, २०१३.

<u>प्रस्तावना-</u>

वलगाव, तालुका व जिल्हा अमरावती येथे संत गाडगेबाबांचे निर्वाण भूमीच्या विकासाकरिता संदर्भाधिन क्र.१ अन्वये रु.३७८६.८४ लक्ष किंमतीच्या विकास आराखडयास मान्यता देण्यात आली असून सदर आराखडयाचे संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे सोपविण्यात आली आहे. सदर आराखडयाचे संनियंत्रण व अंमलबजावणी प्रभावीपणे करणे शक्य व्हावे याकरिता शासन निर्णय संदर्भाधिन क्र.२ अन्वये "कार्यकारी समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर "कार्यकारी समिती" मध्ये स्थानिक व्यक्तींचा "सदस्य" म्हणून समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

संत गाडगेबाबांच्या निर्वाण भूमीच्या विकास आराखडयाची अंमलबजावणी व संनियंत्रण प्रभावीपणे करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या "कार्यकारी समिती" मध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधींचा "सदस्य" म्हणून समावेश करण्यात येत आहे.

१. श्री. मामासाहेब निर्मळ	- सदस्य
२. श्री. सुनिल मानकर	- सदस्य
३. श्री अविनाशराव ठाकरे	- सदस्य
४. श्री. अनिल सिकची	- सदस्य
५. श्री संजय उमेकर	- सदस्य

२. विशेष कार्य अधिकारी (मो.वि.आराखडा), विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती तथा सदस्य सचिव यांनी उपरोक्त आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१३११७३२४७४११६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नांवाने,

Digitally signed by Vidya Hampayya
Date: 2018.01.31 17:37:18 +05'30'

(विद्या हम्पय्या)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत तातडीच्या आवश्यक कार्यवाहीसाठी,

१. विभागीय आयुक्त, अमरावती
२. जिल्हाधिकारी, अमरावती

प्रत माहितीसाठी,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (उद्योग व खणीकर्म, व पर्यावरण) तथा पालकमंत्री (अमरावती) यांचे खाजगी सचिव, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. ॲड. यशोमती ठाकूर, मा. विधानसभा सदस्य, तिवसा, जि. अमरावती,
८. सर्व सन्माननीय संसद सदस्य /विधानसभा/ विधान परिषद सदस्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१,मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती
१३. वित्त विभाग (व्यय-८)/(अर्थ-१६), मंत्रालय, मुंबई
१४.सार्वजनिक बांधकाम विभाग/ इमारती-३, मंत्रालय, मुंबई
१५.जलसंपदा विभाग/मोप्र-२, मंत्रालय, मुंबई
१६.जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
१७.नियोजन विभाग, का-१४२५, मंत्रालय, मुंबई
२०.निवड नस्ती, का-१४४४, नियोजन विभाग, मुंबई.